# आयुर्वेदीय व्याधी निदान पद्धती विशेषता

“मी  एवढ्या दवाखान्यांच्या पायऱ्या झिजवल्या , पण अहो डॉक्टर साहेब तुम्ही मला हे तासभर जे काही प्रश्न विचारले ते मला आजवर कोणीही विचारले नाहीत हो”. असे उद्गार अगदी नित्य आयुर्वेदिक चिकित्सकाला रुग्णाकडून ऐकायला मिळतात. हे अगदी खरंच आहे कारण आयुर्वेद शास्त्रामध्ये रोग निदानाचे जे काही विविध पैलू आहेत ते अन्य कोणत्याही शास्रात नाही. आयुर्वेदिक रोगनिदान ही एक व्यापक संज्ञा आहे त्यामध्ये रोग आणि रुग्ण दोघांचाही परीक्षा केल्या जातात. **“हेतु लिंङ्गाभ्यां ह्यामय परीक्षयानन्तर यथायोगम् आमय प्रशमनार्थम् औषधम् दातुमुचितम् ।तस्मात् हेतुलिंङ्गयोरेवोपपादनं प्राग्युक्तम् ,न त्वौषधस्य।।“**

**(सर्वांगसुंदर टीका / अ. हृ. नि. १)**

अर्थात हेतु लिंगाने व्याधीची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करावी. थोडक्यात व्याधी निदानाचे महत्व चिकित्सेचे करिता अनन्यसाधारण आहे. **चरक.नि.अध्याय ५ चक्रपाणि टीकेत** म्हटलेच आहे की,

**“हेतु लिंङ्ग ज्ञान पूर्विका ही चिकित्सा साध्वी भवति।“**

रोगनिदान हे रोग परिहारासाठी आहे ही दृष्टी डोळ्यापुढे ठेवून प्रायः रोगनिदान केले जाते. म्हणून त्यातील परिभाषा आणि वर्णन चिकित्सेवर प्रकाश पाडणारे असेच नेहमी असावे लागते. त्यामुळे रोगनिदान झाले की चिकित्सा प्राप्तच झाली असे समजले जाते. रोग परिहार हे वैद्यक शास्त्राचे साध्य आहे व रोगनिदान हे त्याचे एक साधन आहे असे म्हणण्यास हरकत नाही. म्हणूनच, **“रोगम् आदौ परिक्षेत ततो अनन्तरम् औषधम्।“ (च.सू.२०/२०)**असे शास्त्रकार सांगतात. चिकित्सा सुरू करण्यापूर्वी वैद्याचे आद्यकर्तव्य व्याधी निदान करणे हे असते. तशी औषधे तर मग औषधविक्रेता ही देतो. रोग निदान करणे हे वैद्याचे वेगळेपण आहे. रोग आणि रुग्ण परीक्षेने व्याधी निदान करून शास्त्रज्ञान व कर्माभ्यास जनित ज्ञान यांच्या आधारे चिकित्सेस प्रवृत्त व्हावे. एखाद्या चिकित्सकाला औषधाचा योग्य रीतीने उपयोग करण्याचे ज्ञान असूनही जर त्याने रोगज्ञान न करता चिकित्सा सुरू केली तर त्या चिकित्सेच्या  सफलते विषयी साशंकता निर्माण होते. प्रत्येक रोगाचे योग्य ज्ञान असणारा, सर्व प्रकारच्या औषधींचे सम्यक ज्ञान असणारा ,देश व काल आदींचे यथायोग्य ज्ञान असणारा तसेच ज्याला शास्त्रावरील अतूट निष्ठा तोच वैद्य निश्चितपणे चिकित्सेमध्ये सफलता प्राप्त करतो.रोग परीक्षेने रोगाचे ज्ञान होते तर रोगी परीक्षेने रुग्णाचे बलाबल याचे ज्ञान होते. रोग-रोगी परीक्षा या आयुर्वेदीय रोगनिदानाचे वैशिष्ट्य आहे. इतर कोणत्याही शास्त्रात अशा सखोल परीक्षांचे वर्णन नाही. निदान पंचका च्या सहाय्याने रोग परीक्षा केली जाते.

ANANT AYURVED PRATISHTHAN

म्हणूनच त्यास व्याधी ज्ञानोपाय असे म्हटले आहे. **“व्याधेःज्ञातव्यस्य पञ्च ज्ञानोपाया भवन्तीति तानाह - निदानमित्यादि। एते पञ्च व्यस्ता: समस्ताश्च व्याधिबोधका:।“ ( मधुकोष टीका१)**

**“निदानम् पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा। सम्प्राप्तिश्चेति विज्ञानम् रोगाणां पञ्चधा स्मृतम्।।“(अ. हृ. नि. १/२)**

**अ) <u>निदान-</u> “सेतिकर्तव्यताको रोगोत्पादक हेतुः निदानम्।“ (मधुकोष टीका१)**

व्याधीज्ञानोपायाचे प्रथम साधन म्हणजे निदान होय. रोगनिदान करताना हेतुंचा विचार कुठे कुठे कसा कसा केला जातो ते आता सविस्तर पाहू. **“पुरूषं पुरूषं वीक्षं स ज्ञेयो भिषगुत्तमः।“ ( च.सू.१/२०)**
चरक सूत्रस्थान आतील या सूत्रातून दिसून येते की प्रत्येक पुरुषाचे शरीर भिन्न असते.त्यामुळे त्याचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करावा लागतो. एखाद्या व्याधीची लक्षणे ही व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न दिसून येतात. व्यक्तीपरत्वे बदलणारे हेतु,बल, देश, काल, दोष, सात्मय, आहार, प्रकृती, वय इत्यादीचा विचार येथे येतो आणि म्हणूनच त्या व्याधीची चिकित्सा सुद्धा व्यक्तीपरत्वे बदलते.जसे की वर्षा विहारासाठी एखादा व्यक्ती समूह गेला असता सर्व च जण आजारी पडतात का?नाही. त्यातील काहींनाच ज्वर,कास,प्रतिश्याय आदी लक्षणे दिसून येतात, काहींना एकच लक्षण दिसून येते किंवा काहींना अजिबात त्रास होत नाही. हेतू आहारज, विहारज, मानस, पूर्वजन्म कृत असे विविध प्रकारचे असतात. हेतूंना आयुर्वेदीय रोगनिदानात विशेष महत्त्व आहे कारण आयुर्वेद शास्त्राने कार्यकारण सिद्धांत मानला आहे, कारणाशिवाय कार्याची उत्पत्ती होऊ शकत नाही. त्यामुळे रुग्णपत्रका वरील माहिती भरतांना हेतू शोधणे हाच उद्देश असतो हेतू सापडले की पुढील व्याधीनिदानाला दिशा मिळते. चरकसंहितेतील सूत्रस्थानाच्या २८व्या अध्यायात अहितकर आहारासंबंधी वर्णन आहे. त्यामध्ये कोणते हेतु व्याधीकर होतात व कोणते व्याधीकर होत नाही यावरून हेतू नेमके कशाला म्हणावे हे स्पष्ट होते. केवळ हितकर आहार सेवन यामुळे सर्व रोग होण्याचे भय दूर होत नाही, कारण अहितकर आहाराच्या सेवनाने खेरीज सुद्धा इतर अनेक कारणे रोग उत्पादक आहेत जसे की,

**“तद्यथा-कालविपर्ययः,प्रज्ञापराधः,शब्दस्पर्शरूपरसगन्धाश्चासात्म्या इति। ताश्च रोगप्रकृयोरसान् सम्यगुपयुञ्जानमपि पुरूषमशुभेननोपपादयन्ति। तस्माध्दिताहारोपयोगिणोऽपि दृश्यन्ते व्याधिमन्तः।।“ (च.सू. २८/७.१)**

ज्या व्यक्ती अहितकर आहार सेवन करतात त्यांचा हा अहितकर आहार रूपी अपचार तत्काळ दोष प्रकोप होत नाही ह्याचे कारण पुढील श्लोक पंक्तीमध्ये स्पष्ट होते.

ANANT AYURVED PRATISHTHAN

**"न सद्यो दोषवान् भवत्यपचारः। न हि सर्वाना अपथ्यानि तुल्यदोषाणि, न च सर्वे दोषास्तुल्यबलाः,न च सर्वाना शरीराणि व्याधिक्षमत्वे समर्थानि भवन्ति। तदेव हि अपथ्यं देशकालसंयोगवीर्यप्रमाणातियोगात् भूयस्तरम् अपथ्यं सम्पद्यते।।" (च. सू. २८/७.२)**

अर्थात अपचार लगेच दोष प्रकोप होत नाही. अपथ्याला देश, काल, संयोग, वीर्य, प्रमाणातियोगाची जोड मिळाली तरच तरच ते व्याधी कर होते. मद्यपानाचे उदाहरण घ्या ना, मद्यपान हा हेतू पित्तकर आहे परंतु तो वरील मुद्यांच्या अनुषंगाने एखाद्याला जास्त त्रासदायक तर एखाद्याला कमी त्रासदायक ठरू शकतो किंवा एखाद्या त्रासदायक न ठरता लाभकर ठरतो. मद्यपानः

| जास्त अपथ्यकर | कमी अपथ्यकर् |
|---|---|
| १.उष्ण प्रदेश | १.शीत प्रदेश |
| २.शरद ऋतु | २.हेमंत ऋतु |
| ३.फक्त मद्यपान | ३.जल मिसळून पान |
| ४.अतिमात्रेत सेवन् | ४.अल्प मात्रेत् सेवन् |
| ५.पित्त प्रकृती | ५.कफ प्रकृती |

आयुर्वेद शास्त्रानुसार आक्रमण हे एकाच वेळी सर्व व्यक्तींवर होत नाही याचे कारण असे की, **"शरीराणि च अतिस्थूलानि अतिकृशानि अनिविष्टमांसशोणितास्थिनी दुर्बलानि असात्मय आहारोपचितानि अल्प आहारानि अल्प सत्वानि च भवन्ति व्याधिअसहानि , विपरीतानि पुनःव्याधिसहानि।।" ( च. सू.२८/७.३)**
सदर श्लोक पंक्तीमध्ये उल्लेख केलेल्या शरीर विशेष युक्त व्यक्तीमध्ये व्याधी आक्रमण त्वरित होते. त्यास व्याधी दुःख ही असहनीय होते. ज्या व्यक्तींमध्ये या विपरीत शरीर विशेष असतात त्यांच्यात व्याधी प्रादुर्भाव होत नाही किंवा झाला तरी त्यातून ते लवकर बरे होतात.सध्याच्या कोरोना व्याधीच्या साथीच्या विचार केला कोरोना व्याधीची लक्षणे फार मारक नाही असे दिसून येते. तरीसुद्धा काही व्यक्तींचा मृत्यू झाला, काहींना फक्त लक्षणे दिसली तर काहींना व्याधी झालाच नाही, या सर्व परिस्थितीची उकल वरील सूत्रातून होते.

१)ज्या व्यक्तींचा मृत्यू झाला त्यांच्यात अतिस्थूलादि मुद्द्यांपैकी एक वा अनेक मुद्दे उपस्थित होते विशेषतः मृत्यूचे भय हे प्रमुख कारण होते.

२)लक्षणे दिसणार्यांमध्ये शरीर दुर्बलता जरी असली तरी सत्व बलवान असल्यामुळे ते व्याधी मुक्त झाले.

३) ज्या व्यक्तींना व्याधी झालाच नाही त्यांच्यामध्ये वरील सर्व मुद्द्यांच्या विपरीत गुणांमुळे उत्तम व्याधीक्षमत्व होते. त्यामुळे त्यांना व्याधी झालाच नाही.

ANANT AYURVED PRATISHTHAN

आयुर्वेद शास्त्रामध्ये व्याधींचे असंख्य हेतू सांगितले आहेत,परंतु वेग विधारण ,वेगोदीरण ही आयुर्वेदशास्त्रवर्णीत संकल्पना हेतू म्हणून विशेष महत्त्वाची आहे .शास्त्रकारांनी या हेतूच्या वर्णनासाठी स्वतंत्र अध्याय वर्णन केला आहे यावरून वेगविधारण व वेगांचे उदीरण यांना असलेले महत्त्व अधोरेखित होते.

**"रोगा: सर्वेऽपि जायन्ते वेगोदीरनधारणै:!"   (अ.हृ .सू-४/२०)**

हल्लीच्या काळात कळत नकळत असुदे की शिष्टाचारामुळे असुदेत वेगांचे धारण व उदीरण घडून येते. विशेषतः ऑफिसमधील काम, शिक्षकी पेशा , टॅक्सी चालक इ. व्यवसायांमुळे हृदयाभिसरण संस्था , पचनसंस्था , प्रजनन संस्था, मूत्रवह संस्था यांचे व्याधी दिसून येतात.पुढील उदाहरणातून अधारणीय वेग धारण जन्य व्याधी कसा घडून येतो ते आपल्याला उमजेल..

आजकाल उर्ध्वग अम्लपित्त हा व्याधी सर्रासपणे दिसून येतो.त्यामध्ये येणाऱ्या छर्दी वेगाला रोखण्यासाठी वर्षानुवर्ष antacids सेवन केले जाते.त्यामुळे अशा रुग्णांमध्ये या छर्दि वेगधारणामुळे पुढीलपैकी कोणत्याही व्याधी ची संप्राप्ती घडून येते-विसर्प,कोठ,कंडू,व्यंग,श्वयथु इ.

<u>विरुद्धआहार</u>

वेग विधारण जशी आयुर्वेदाची एकमेव संकल्पना आहे, विरुद्धआहार ही सुद्धा आयुर्वेदाची अद्वितीय संकल्पना आहे. चरक, सुश्रुत,वाग्भट, आदी सर्वच शास्त्रकारांनी विरुद्ध आहाराला अत्यंत महत्त्व दिलेले आहे कारण,

**१)विरुद्धवीर्याशनम् निन्दितव्याधीकराणाम्!         (च.सू.२५)**

**२)विरुद्धमपि च आहारम् विद्यात् विषगरोपम्!       (अ.हृ.सू-७)**

हल्लीच्या काळात सर्रासपणे मांसाहार शिजवताना दधी घालने ,ब्राउनी, मांसाहारानंतर आईस्क्रीम सेवन,गरम पाण्यासोबत मध घेणे , कोक व बर्गर एकत्र खाणे, चहा पूर्वी किंवा नंतर पाणी पिणे यांसारखे वीर्य विरुद्ध आहार, पान केले जाते. त्यामुळे व्याधी निदान करताना विरुद्ध आहार या हेतूच विचार करावा.

<u>हेतू ज्ञानाचे महत्व</u>: **"संक्षेपत: क्रियायोगो निदानपरिवर्जन!"   (सु.उ-१)**

जोपर्यंत निदान परिवर्जन होत नाही तोपर्यंत कुठल्याही व्याधीची चिकित्सा सफल होऊ शकत नाही उलट तो अधिक कष्टसाध्यतेकडे जाईल. त्यामुळे निदान परिवर्जनासाठी हेतू सापडणे खूप महत्त्वाचे असते. उदाहरणार्थ,

**"पांडूरोगी तु योऽत्यर्थम् पित्तलानि निषेवते ....।"            (च.चि.१६/३४)**

म्हणजे पित्तकर हेतु परिवर्जन केलेच नाही तर पांडूची परिणती कामलेमध्ये होते.

**<u>ब) सम्प्राप्ति:</u>"यथादुष्टेन दोषेण यथाचानुविसर्पता। निर्वृत्तिरामयस्यासौ सम्प्राप्तिर्जातिरागति।।"**

ANANT AYURVED PRATISHTHAN

**(अ.हृ. नि. १/८)**

शरीरातील विकृतीचा नकाशा म्हणजे संप्राप्ती होय.संप्राप्ती या व्याधीज्ञानोपायाचा विचार करताना षट्क्रियाकाल, व्याधीघटक(दोष,दुष्य,अग्निमांद्य,आम,स्रोतोदुष्टी)विकारविघातकर भाव या बाबींचा ऊहापोह करणे क्रमप्राप्त ठरते.

**<u>व्याधीघटक</u> :** १)<u>दोष :</u> आयुर्वेदशास्त्र हे त्रिदोष सिद्धांतावर आधारीत आहे.

**"वायू:पित्तम् कफश्चोक्तम् शारीरो दोषसङ्ग्रह:। मानस:पुनरुदिष्टोरजश्च तम एव च।। (च.सू-१/५७)**

शरीरात कोणतीही विकृती असो त्यास वात, पित्त आणि कफ यांचे वैषम्य कारणीभूत ठरते व त्यांचे साम्य हे आरोग्याचे कारण आहे. **"सर्व एव निज विकारा: न अन्यत्र वात पित्त कफेभ्यो: निर्वर्तन्ते।" (च.सू-१९/५)**

त्रिदोष सिद्धांत आयुर्वेदिक निदानाचे मुलभूत वैशिष्ट्य आहे. रोग निदानाकरिता दोषविचार अंशांश कल्पनेनुसार केला जातो. विशिष्ट हेतूने विशिष्ट दोषांचा विशिष्ट गुणच प्रकुपित होतो यास दोषांची अंशांश कल्पना/विकल्प सम्प्राप्ति म्हणतात.

**"दोषाणाम् अंश अंश प्रति विकल्पोऽशान्श विकल्प:।" चक्रपाणी (कुष्ठ नि-५/४)**

उदा०,१)**रात्रौ जागरणम् रुक्षम् स्निग्धम् प्रस्वप्नम् दिवा। (अ.हृ. सू-७/५५)**

रात्री जागरण-रुक्ष गुणाने वात प्रकोप. दिवास्वप्न- स्निग्ध गुणाने कफ प्रकोप.

२)अतिमद्यपान - उष्ण, तीक्ष्ण गुणाने पित्त प्रकोप.

**<u>व्याधीतील अंशांश कल्पना विचार.</u>**

१)<u>अम्लपित्त -</u> हेतू-विरुद्ध ,दुष्ट, अम्लं,विदाही पित्तप्रकोपी अन्नपान >पित्ताचा द्रव, अम्ल गुणाने प्रकोप .

२) वातरक्त -**"वातप्रकोपक हेतु - हयोष्ट्रयानायानाम्बुक्रिडाप्लवनलंघनैः।**

**रक्तप्रकोपक हेतु - दध्यारनालसौवीरशुक्ततक्रसुरासवैः।" (च. चि.२९/५-१०)**

**"सौक्षम्यात् सर्वसरत्वाच्च पवनस्यासृजस्तथा।**

**तद्द्रवत्वाच्च सरत्वाच्च देहं गच्छन् सिरायनैः।।" (ची.चि.२९/१३)**

वात - सूक्ष्म,सर गुणाने प्रकोप रक्त - द्रव, सर गुणाने प्रकोप

हेतुंच्या अंशांश कल्पनेने दोषांचे गुण वैषम्य समजल्यामुळे त्या व्याधीची संप्राप्ती कशी घडली, स्त्रोतोदुष्टी,दोषदुष्य समुर्छना कुठे झाली याचे ज्ञान होते, त्याआधारे संप्राप्ती भंग करणे सहज शक्य होते.

**२.<u>दुष्य:</u> "दोषदुष्य सम्मूर्छना जनितो व्याधि:।" (मा .नि-१-मधुकोष टीका)**

ANANT AYURVED PRATISHTHAN

व्याधी निदान करताना धातू व मल यांपैकी कोणाकोणाची दुष्टी झाली हे जाणून घेणे महत्वाचे असते. उदाहरणार्थः रक्तपित्त व्याधीमध्ये प्रकुपित पित्त रक्ताशी संयुक्त झाल्यामुळे, पित्ताने रक्त दूषित केल्यामुळे रक्तपित्त व्याधी मध्ये रक्त हे दुष्य आहे.दुष्टदुष्य समजल्यावर त्यावर प्राधान्याने चिकित्सा करता येते.

**<u>३.अग्नि:</u>** अग्नि विचार आयुर्वेद रोग निदानाचे वैशिष्ट्य आहे. कारण तुमची भूक कशी आहे ?खाल्लेले अन्न पचते का? पोट साफ होते का? हा विचार फक्त आयुर्वेदातच केलेला आहे कारण,

**"अग्निदोषात् मनुष्याणाम् रोग संङ्घा पृथग्विधा:।"          (च.चि. -१३/७)**

ही संकल्पना आयुर्वेदाचा मूलभूत सिद्धांत आहे म्हणूनच सुश्रुतांनी स्वास्थ्याच्या व्याख्येत समाग्नी असे म्हटले आहे.
**"जठरानल दौर्बल्यात् अविपक्वस्तु यो रस:। स आम सज्ञको देहे सर्वदोष प्रकोपन:।"(मधुकोष टीका१)**

अग्निदुष्टीमुळे आम निर्मिती होते म्हणजे व्याधी निदानामध्ये आम व अग्नी यांच्यातील दुष्टचक्र विचारात घेणे आवश्यक आहे कारण व्याधी मुक्तीसाठी अग्नि दुरुस्त करणे व आमाचे पाचन करणे म्हणजेच व्याधीच्या मुळावर आघात करणे होय.

**<u>४.स्त्रोतोदुष्टी</u>**: आयुर्वेद शास्त्रकारांनी जो स्त्रोतोविचार सांगितला आहे तो रोग निदान करताना अत्यंत महत्त्वाचा आहे कारण, _**"स्त्रोतोमयम् अयम् शरीरम्।"**_शरीरातील सर्व भाव घटक स्त्रोतासांशिवाय उत्पन्न होत नाही किंवा क्षय ही होत नाही, यामुळेच शास्त्रकार सांगतात की,_**"सर्वे हि भावा:पुरुषेनान्तरेन् स्त्रोतस्यभिनिर्वर्तन्ते, क्षयम् वाऽप्यभिगछन्ति।"          (च.वि.५/३)** ज्याप्रमाणे एखाद्या घरात कचरा खूप झाला असता ते घरंच घाण होते त्याप्रमाणे दुष्यांची दुष्टी झाल्यामुळे त्यांचे वहन ज्यातून होते त्या स्त्रोतसांचीदेखील दुष्टी होते. स्त्रोतोदुष्टी हे रोगाच्या सम्प्राप्तिचे मुळ आहे .

**<u>स्त्रोतोवैगुण्याची लक्षणे :</u>**

**"अतिप्रवृत्ती: संगो वा सिराणाम् ग्रन्थयोऽपि वा। विमार्गगमनम् चापि स्त्रोतसाम् दुष्टी लक्षणम्।।" (च. वि.५/२४)**

| **स्त्रोतस** | **अतिप्रवृत्ती** | **संग** | **सिराग्रन्थि** | **विमार्गगमन** |
|---|---|---|---|---|
| **मूत्रवह स्त्रोतस** | प्रमेहातील बहुमूत्रता | मूत्रकृच्छ्र - मूत्रप्रवृत्ती अल्प वा अडखळत | सिराकौटिल्य-शैथिल्य | दंडालसक(साम दोष तिर्यक होतात) |

**<u>स्त्रोतोदुष्टीचे सम्प्राप्तिमधील महत्व</u>**:    **"यत्र सङ्गः खवैगुण्यात् व्याधीस्तत्रोपजायते।"     (सु.सू २४/१०)**

ANANT AYURVED PRATISHTHAN

संप्राप्ती विचाराचा ऊहापोह षट्क्रियाकाला शिवाय पूर्णत्वास जाणार नाही. षट्क्रियाकाल म्हणजे व्याधीची संप्राप्ती कोणत्या क्रमाने घडते ते होय.

**<u>षट्क्रियाकालाचे महत्व :</u>** १.रोगनिदानाच्या वेळी षटक्रियाकालाचे ज्ञान म्हणजेच व्याधी संप्राप्ती भंगासाठी एक सुवर्णसंधी असते.म्हणजेच षट्क्रियाकाल ज्ञानाने व्याधीचे लवकर निदान होते व चिकित्साही करता येते म्हणूनच सुश्रुत संहितेमध्ये याचे महत्त्व वर्णन करताना पुढील श्लोक वर्णन केला आहे.

**"संचयेऽपहृता दोषा लभन्ते नोत्तरागति:। तेतूत्तरासु गतिषु भवन्ति बलवत्तरा:।।" (सु.सू-२१/३७)**

२)षट्क्रियाकाल ज्ञानाने दोषबल समजते व त्यानुसार चिकित्सा ठरविता येते.

दोष- अल्प -संशमन; मध्यम -लंघन; उत्तम-शोधन

३) साध्यासाध्यता ठरविता येते.

४) व्याधी ज्ञान लवकर झाल्यामुळे पुढील अवस्थांचा प्रतिबंध करता येतो.

५)षट्क्रियाकाल ज्ञान असेल तर व्याधी निदान योग्य प्रकारे होऊन योग्य काळी चिकित्सा देणे शक्य होते अन्यथा व्याधी असाध्यत्वाकडे जातो याची पुष्टी पुढील सूत्रातून मिळते.

**"अप्राप्ते वा क्रियाकाले प्राप्ते वा न कृता क्रिया।**

**क्रिया हिना अतिरिक्ता वा साध्येष्वपि न सिध्यति।।" (सु.सू-३५/२२)**

| | |
|---|---|
| १.संचय | स्वस्थानी वात व कफ दोषांचा चय होतो. |
| २.प्रकोप | वात – कोष्ठतोद संचरण; कफ – अन्नद्वेष, हृदयोत्क्लेद |
| ३. प्रसर | वात-वायोर्विमार्गगमन, आटोप; कफ-अरोचक, अविपाक, अंगमर्द |
| ४. स्थानसंश्रय | मारुतः प्राणवाहिनी स्त्रोतांस्याविश्य कुप्यति। उरस्थ: कफमुध्दुय। च. चि. १७/१७<br>अनाहं पार्श्वशूलंच पीडनं हृदयस्य च प्राणस्य च विलोमत्वं । च. चि. १७/२० |
| ५.व्यक्ति | शयान: श्वासपीडित आसीनो लभते सौख्यम् उष्णं चैव अभिनंदति\|<br>मेघाम्बुशीत प्राग्वातै श्लेष्मलैश्च विवर्धते\| (च. चि-१७/६२) |
| ६.भेद | २प्रकार<br>१.वातभूयिष्ठ, कफभूयिष्ठ<br>२.शुष्क कास,आर्द्रकास. |

ANANT AYURVED PRATISHTHAN

| | |
|---|---|
| | ३.कष्टाने कफष्ठिवन, कफ  ष्ठिवनअधीक<br>४.रुक्ष वातज ध्वनी, स्निग्ध ध्वनी |

विकार विघातकर भाव व्याधी संप्रातीच्या प्रक्रियेला विरोध करतात व विकारविघातभावाभाव व्याधी संप्राती ला अनुकूल ठरतो. उदा. प्रमेह, हेतु- **आस्यासुख, स्वप्नसुख । (च. चि.6/4)** , दोष -**बहुद्रवः श्लेष्मा दोषविशेष:। (च. नि.4/6),** दुष्य - **बहुअबद्ध मेद, मांस, शरीरक्लेद, शुक्रशोणित, वसा, मज्जा, लसिका, रस, ओज, संख्यात इति दूष्यविशेषा ।** वरील प्रमाणे हेतु दोष दूष्य असेल तरच प्रमेह संप्राप्ती घडून येते अन्यथा नाही.

**क)पूर्वरूप** - स्थानसंश्रय अवस्थात पूर्वरूपे दिसून येतात.

**स्थानसंश्रयिण: क्रुद्धाभाविव्याधिप्रबोधकम्। दोषा: कुर्वन्ति यल्लिड्ग पूर्वरूपम् तद् उच्यते । मधुकोष टीका**

**(१)**पूर्वरूप अवस्था ज्ञानावरुन व्याधीचे साध्यासाध्यता ठरवता येते. जसे की सर्व पूर्वरूपे सापडल्यावर व्याधी असाध्य समजावे.(च.इं.5/4). (२)अवस्थेचे ज्ञान असलेला वैद्याला भावी व्याधीचे ज्ञान झाल्यामुळे लवकर चिकित्सा केल्याने रोगाला गंभीर स्वरूप प्राप्त होत नाही. उदा. प्रमेह पूर्वरुपात दंतादिनामलाढयत्वं, हस्त पाद दाह, मुखमाधुर्य (च. चि.6) व्याधी चिकीत्सा लवकर झाल्याने व्याधीमुक्त अवस्था शीघ्र प्राप्त होते. (३)रुग्ण जर रूपावस्थेत आला तर व्याधी संबंधी निर्माण झालेल्या संदेहाचे, पूर्वी अमुक-अमुक पूर्वरूपे दिसली होती का? यावरून निराकरण होते. जसे की एखाद्या व्याधींमध्ये प्रमेहाची पूर्वरूपे नसतील आणि हळदीच्या पाण्याप्रमाणे पित्त-रक्तवर्णी मूत्रप्रवृत्ती असेल तर त्यास प्रमेह न समजता रक्तपित्त समजावे.

**ड) रूप- तदेव व्यक्तताम् यातं रूपमित्यभिधियते (अ. हृ. नि.1/5)**

बहुदा रुग्ण रूपावस्थेतच येतो. व्याधीची निश्चिती करणारी अवस्था म्हणजेच रूप होय. व्याधी ठरवताना त्याचे मुख्य लक्षण त्यामध्ये असले पाहिजे. अन्यथा वायु, पित्त, कफाची लक्षणे सगळीकडे सारखीच असतात. जसे की १)अतिसार -गुदेन बहुद्र सरणम् ।  २) ज्वर - संतापो देह मानस:।

३)ज्वरादी रोगांच्या बरोबर अरुची,तृष्णा आदी असतात, तेव्हा ते परतंत्र असल्यामुळे त्यांना लक्षण म्हटले जाते.

**ज्ञानार्थं चानि च उक्तांनी व्याधी लिंड्गानी संग्रहे ।व्याध्यस्ते तदात्वे तु लिंगानीष्टानी नामया ॥(च. नि.८/४०)**

३) व्याधी व लक्षण: लक्षणे ही स्वसंवेद्य व परसंवेद्य  असतात व रोगाचे वर्णन देत असता ती समुच्चयाने सांगितलेली असतात. पण कोणते लक्षण किती प्रमाणात असते व कोणत्या लक्षणाचे महत्त्व किती याचे ज्ञान प्रत्यक्ष ज्ञानातूनच उत्पन्न होणारे आहे.

ANANT AYURVED PRATISHTHAN

**इ)उपशय - औषधादिजनित सुखानुबंध उपशयः (मा. नि.१)** उपशयालाच व्याधीसात्म्यही म्हटले आहे. गुढ लिंग असणाऱ्या व्याधीची परीक्षा उपशयानुपशयाने केली जाते. म्हणूनच

**गुढलिंगाभ्यां व्याधिम्  उपशय अनुपश्याभ्याम् परीक्षेत ।(च. वि.4/15)**

जसे की दाह हे लक्षण पित्तप्रकोपजन्य आहे की, आशयापकर्षाने प्रकुपित वाताने सम पित्त विमार्गग झाल्याने निर्माण झाले आहे याची निश्चिती शीत उपचाराने केली जाते. शीत उपचाराने पित्तप्रकोपजन्य दाहाचे शमन होते, तर आशयापकर्षणजन्य दाह वृद्धी होते कारण सम पित्ताचा क्षय होतो.

**<u>त्रिविध बोध्य संग्रह</u>** - हल्लीच्या काळात अनेक नवनवीन आजाराचा सामना करावा लागतो परंतु समस्या अशी निर्माण होते की त्याचा ग्रंथात उल्लेख आढळत नाही. मग तो सध्याचा कोरोना असो वा पूर्वीपासून प्रचलित डेंग्यू ,मलेरिया, चिकूनगुनिया, हायपोथायरॉईडीझम्, कॅन्सर यासारखे व्याधी असो. ज्यावेळी अशा अनुक्ता व्याधींच्या निदानाची वेळ येते, त्यावेळी मोहग्रस्त न होता शास्त्रकारांनी पुढील सूत्राचा अवलंब करावा.

**तस्मात् विकारप्रकृतीअधिष्ठानांन्तराणणि च। समुत्थानविशेषांश्च ज्ञात्वा कर्म  समाचरेत् ।(च. सू.18/45)**

यालाच त्रिविध रोग बोध्य संग्रह असे म्हणतात. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर आधुनिक मतानुसार चा हायपोथायरॉईडीझम् या व्याधीचे प्रयोगशालेय परीक्षणे व ठराविक लक्षणांवरून निदान केले जाते. परंतु हाच तेव्हा वरील त्रिविध बोध्य संग्रहाच्या सहाय्याने जाणून घेऊन पुढे निदान केले. मग ते निदान स्थौल्य असेल अथवा रस प्रदोषज विकार अथवा ते पांडू कडेही जाऊ शकते. व्यवहारात असे दिसून येते की रुग्ण खूप असंबद्ध  लक्षणे सांगतो. अशावेळी त्या लक्षणांवरून व्याधी निश्चिती करताना व्याधीचे नामकरण करणे या गोष्टीला जास्त महत्व न देता त्यातील व्याधी घटकांच्या आधारे दोष -दुष्य आदि निश्चिती करून निदान करावे. या संकल्पनेची पुष्टी श्लोकपंक्ती मध्ये दिसून येते.

**विकारामकुशलो न जिह्हियात् कदाचन ।न ही सर्व विकाराणां नामतोऽस्ति ध्रुवास्थितिः॥ (च. सू.18/44)**

**<u>रोगानीकम् विमान</u>** या अध्यायामध्ये रोग समूहाचे वर्णन केले आहे. त्यामुळे एकाच व्याधीचे चौफेर दृष्टीने ज्ञान होते.

**<u>दशरोगानीक</u>**

| **प्रभाव** | **बल** | **अधिष्ठान** | **निमित्त** | **आशय** |
|---|---|---|---|---|
| साध्य | मृदू | मन | दोषज | आमाशय |
| असाध्य | दारुण | शरीर | आगंतुज | पक्वाशय |

१)चिकित्सकाला रोग परीक्षणासाठी जेवढ्या गोष्टींचे  ज्ञान आवश्यक आहे. त्यात सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे रोग साध्य आहे की नाही याचे ज्ञान.

AVANTI AYURVED PRATISHTHAN

**साध्य असाध्य विभागयज्ञो ज्ञानपूर्व चिकिसक:॥ (च. सू.10/7)**

**अन्यथा अर्थविद्यायशोहानि उपक्रोशमसंग्रहम् ॥ (च.सू.10/7)**

२)मृदू, दारुण यावरून व्याधीचे बल ठरवले जाते. उदाहरणार्थ, नासागत रक्तपित्त हा व्याधी मृदू आहे कारण तो आतपसेवनासारख्या नैमित्तिक कारणांनी सुद्धा होतो. त्याचा उपशय शीत जलपरिषेक, गोदुग्ध नस्य आदी शीत चिकित्सेने होतो.

अधोग रक्तपित्त मूत्रमार्ग/गुदगत /योनी गत असेल तर ते दारूणत्वा कडे जातो. त्याची चिकित्सा ही प्रतिमार्गग शोधन चिकित्सा ,स्तंभन, दीर्घकाल औषधे सेवन अशी करावी लागते. दारूण व्याधी फक्त चिरकालीन असतो असे नव्हे तर आत्ययिक अवस्थेतही व्याधी बल जास्त असते, अशावेळी अचूक व्याधीबल कळणे हे महत्त्वाचे असते.

3) मानस , शारीर - ज्याप्रमाणे भांडे तापले की त्यातील पाणी गरम होते तसेच शरीर उपतप्त झाले की त्याचा मनावरही दुष्परिणाम होतो. मन व शरीर हे साहचर्याने असल्याने, मानस रोगाचा परिणाम शरीरावर दिसून येतो. आजकाल डिप्रेशन, ताणतणाव ,निद्रानाश, भित्रेपणा यासारखे मानस व्याधी सर्रासपणे पाहायला मिळतात. व्याधीचे निदान करताना व्याधीचा हेतू मानस दोष प्रकोपकर आहे की शारीर दोष प्रकोपक आहे यावर विशेष भर द्यावा कारण त्यावरच चिकित्सा ठरते.

4) दोषज, आगंतुज- व्याधी निदानामध्ये व्याधी निज हेतूंनी उत्पन्न झाला आहे की अभिघातादी आगंतु हेतुंनी दोष प्रकोप झाला आहे याची निश्चिती आवश्यक आहेत उदाहरणार्थ, व्रण - निज दोष प्रकोपजन्य आहे की अभिघातजन्य? कारण त्यानुसार त्याची चिकित्सा बदलते.

५)आशयभेदाने- व्याधी उत्पत्ती आमाशय विकृतीने झाली की पक्वाशय विकृतीने झाली याचे निश्चिती करावी कारण कफपित्तप्रधान व्याधी हे आमाशयोद्भव व सर्व वाजत व्याधी हे पक्वाशयोद्भव असतात. (चक्रपाणी टीका).

आतापर्यंत आपण रोग परीक्षा व तत्संबंधी रोग निदान याची वैशिष्ट्ये पाहिली. इथून पुढे रोगी परीक्षा संदर्भात चर्चा करू.

**रोगी परीक्षा**- तशा अनेक परीक्षा वर्णन केल्या आहे. परंतु त्यातील काही निदानाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रुग्णपरीक्षांचा येथे उल्लेख केला आहे.

**१.त्रिविध रोगी परीक्षा व षड्विध परीक्षा :**

**दर्शनस्पर्शनप्रश्नै: परीक्षेत अथ रोगिणाम् ।(अ. हृ. सू.१/२२)**

**षड्विधाही रोगाणां विज्ञानोपाय: ।तद्यथा - पंचभि: श्रोत्रदिभी: प्रश्नेन च इति ।सु. सू.१०/४)**

ANANTA AYURVED PRATISHTHAN

रुग्ण शरीराचे ज्ञान, दर्शन, स्पर्शन व प्रश्न याद्वारे केले पाहिजे. दर्शन,स्पर्शन,प्रश्न परीक्षा षड्विध परीक्षेतच समावेश होत असल्याने इथे एकत्रच वर्णन केले आहे.

आयुर्वेद रोगनिदानाचे वैशिष्ट्य सांगताना इथे एक मुद्दा अधोरेखित करावा असा वाटतो. एक्स-रे, सिटीस्कॅन ,यूएसजी आदी तसेच प्रयोगशालेय परीक्षण याच्यापेक्षा आयुर्वेदिक रोग निदान हे ज्ञानेन्द्रिय परीक्षेला जास्त महत्त्व देते. अशीच एक केस माझ्या वाचनात आली. ज्यात अश्मरी शूलासाठी त्या रुग्णाला ॲडमिट केले होते त्याची दोन वेळा यु एस जी झाली व त्यात (6mm×2mm) अशा आकाराचा मूत्राश्मरी होता. अश्मरी पातनानंतर त्या मूत्राश्मरी चे माप 17mm×8 mm दिसून आले.सर्रासपणे असे दिसून येते की रेडिओलॉजिकल, लॅबोरेटरी फाइंडिंग च्या आधारे इतर शास्त्रात निदान केले जाते. परंतु त्यावर पूर्णपणे अवलंबून न राहता वैद्यकीय निदानाला जास्त महत्व दिले पाहिजे कारण बऱ्याचदा ते दिशाभूल करणारे असतात. आयुर्वेदिक निदान करताना रेडिओलॉजिकल, प्रयोगशालेय परीक्षणे करूच नये असे मी म्हणणार नाही. परंतु त्याचा उपयोग आवश्यकता असेल तेव्हा आपले निदान निश्चित करण्यासाठीच करावा. ज्ञानेन्द्रिय परीक्षणात इंद्रियांची शक्ती वाढवावी लागते व ती त्यांचा सम्यक उपयोग केल्यानेच वाढते. आपली इंद्रिये ही सैंद्रिय रोगनिदानाची साधने आहेत व इतर निरिंद्रिय आहेत. म्हणूनच ज्ञानेंद्रिय जे ज्ञान देतात तेच खरे मानले पाहिजे. ज्ञानेंद्रियांच्या शक्तीलाही मर्यादा आहे, पण मर्यादा गाठतो तो प्रांत फार मोठा आहे.

<u>**पंचज्ञानेंद्रिय परीक्षा**</u>

| <u>**घ्राणेंद्रिय**</u> | <u>**रसनेंद्रिय**</u> | <u>**श्रोत्रेंद्रिय**</u> | <u>**चक्षुरेंद्रिय**</u> | <u>**स्पर्शनेंद्रिय**</u> |
|---|---|---|---|---|
| कर्दमविसर्प - कुणपगंधी(च.चि.२१/३८) | मधुमेह माधुर्य - पिपीलिका रसनेने(सु.सू१०/५) | अर्दित- दिनाजिम्हासमुत्क्षिप्ता कला सज्जतिचास्य वाक्। (च.चि २८/४) | उदर - तनुऽसित राजिसिरा संतती। (च.चि १३/२५) | संधिगतवात-वातपूर्ण दृतिस्पर्श (च.चि २८/३७) |

**<u>प्रश्न</u>- प्रश्नेन च विजानियात् देशंकालं जातिसात्म्यम् आतंक समुत्पत्तिं वेदनासमुच्छ्रायं बलमन्तरग्निं.....(सु.सू.10/4)** श्वासाच्या रुग्णात ढगाळ वातावरण, पाऊस, गार वारा, कफवर्धक आहार विहाराने लक्षणे वाढतात का? रुग्णपत्रकारावरील माहिती भरताना जे प्रश्न विचारले जातात ते प्रश्न परीक्षेतच येतात.

**<u>चतुर्विध परीक्षा</u> -तस्य चतुर्विधा परीक्षा आप्तोपदेश प्रत्यक्षम् अनुमानं युक्ति: चेति ।(च. सू. ११/१७)**

आप्तोपदेश हेच प्रत्यक्ष, अनुमान, युक्ति या सर्व ज्ञानोपायांचा जनक आहे. प्रत्यक्ष प्रमाण म्हणजेच,

ANANT AYURVED PRATISHTHAN

**स्वयमिन्द्रियैर्मनसा चोपलभ्यते ।(च. वि. ४/४) तसेच,अनुमानं खलु तर्को युक्त्यपेक्ष:। (च. वि. ४/४)**

प्रत्यक्ष प्रमाणाचे सविस्तर वर्णन हे षड्विध परीक्षांच्या अंतर्गत येते. त्यामुळे पुनरुक्ती टाळण्यासाठी अनुमान प्रमाणाचे वर्णन करत आहे.अदृष्ट शल्याचे ज्ञान करून घेताना अनुमानाचा उपयोग केला जातो. जसे की,

**त्वक् प्रनष्टे स्निग्ध स्विन्नायां मृन्माष यवगोधुम गोमयमृदितायां त्वचि यत्र सरंभो वेदना वा भवति तत्र शल्य विजानियात् ।(सु. सू. २६/१२) युक्ती - युज्यते संबंध्यते अनया इति युक्ति:।**

युक्तीचा उपयोग रोगनिदान करताना व्याधिघटकांचा एकत्रित विचार करून त्यातून व्याधिनिष्कर्ष काढताना केला जातो. उदा. रुग्ण वेदना विशेष- रुक् पर्वणां ,भ्रम मूर्च्छा, तमोदर्शन, अरुंषिका - मज्जावह स्त्रोतस दुष्टी लक्षणे

१. मज्जा- अस्थिगत- अस्थि हे वाताचे स्थान आहे, वाताचे प्रमुख स्थान - पक्वाशय म्हणून बस्ती चिकित्सा उत्तम

२. तसेच पित्तधरा कला सा एव मज्जाधरा कला ।

३. अस्थिधातू पश्चात मज्जाधातू बनतो.

**<u>अष्टविध परीक्षा</u> :** अष्टस्थान परीक्षा हे आयुर्वेदिक रोग निदानाची विशेषता आहे.

**रोगाक्रांतशरीरस्य स्थानान्यष्टौ परीक्षयेत् । नाडींमूत्रंमलंजिव्हांशब्दम्स्पर्शंदृगाकृती।। (योगरत्नाकर)**

**<u>नाडीपरीक्षा:</u>** गतीमध्ये हंस, मंडूक, सर्प गतीवाचक संज्ञा अनुभवास येतात. त्यामुळे सर्व देहचारी दोषांचे ज्ञान होते. ते आयुर्वेदीय निदानात उपयुक्त ठरते. नाडी परीक्षणाशिवाय रोगपरीक्षा आंधळी ठरते. कारण रोग = दोषवैषम्य, असा सिद्धांत जे शास्त्र मानते त्या शास्त्राला सर्व देहचारी दोषांचे ज्ञान करून देणारी नाडी उपयुक्त झाल्याशिवाय कशी राहील! उदाहरणादाखल, ज्वर - गंभीर, उष्ण, वेगवती नाडी, मंदाग्नी - मंद नाडी, आम-गंभीर नाडी;असाध्य - कंपन आणि स्पंदन करणारी नाडी.

**<u>मूत्र :</u>** मूत्र परीक्षेचा वापर निदानामध्ये करताना तैलबिंदु परीक्षा ही व्याधीचे साध्यासाध्यत्व, व्याधी प्रकार ठरवायला मदत करते. उदाहरणार्थ, अजीर्णामध्ये तंडुलोदकाप्रमाणे मूत्र वर्ण दिसतो. जीर्णज्वरामध्ये पित्तरक्त वर्णी मूत्रप्रवृत्ती तर सान्निपातिक ज्वरामध्ये सर्व दोषांचे वर्ण दिसतात.

**<u>मल</u> :** मलपरीक्षणामध्ये मलाची राशी, स्वरूप, वर्ण, गंध, सामनिराम लक्षणे हे अनेक प्रकारच्या व्याधींच्या निधनाची साधने ठरतात. जसे की,

**तिलपिष्टनिभं यस्तु वर्च सृजति कामली ।(च. चि.१६/१२४)**

**<u>जिव्हा</u> :** सामनिरामता जिव्हा परीक्षणावरून ठरवली जाते. <u>जिव्हा परीक्षा :</u>

| | | |
|---|---|---|
| अ) <u>दोषानुसार जिव्हा</u> | <u>ब) व्याधीनुसार वर्ण</u> | <u>क) आस्यता</u> |

ANANT AYURVED PRATISHTHAN

| | | |
|---|---|---|
| १.वातज - शीत, रूक्ष, खर | १. पांडु - पांडुर | १. वातज - कषाय |
| २. सान्निपातिक - कृष्ण, कंटकयुक्त, रूक्ष | २. कामला - पीत | २. पित्तज - कटू |
| | ३. हृद्रोग - नील | ३. कफज - मधुर |

**<u>शब्द</u>** : प्रकृतीनुसार व्यक्तीचा आवाज भिन्न असतो. उदाहरणार्थ, पित्तज प्रकृती - स्फुटवक्त्र, कफ प्रकृती - गंभीर स्वर. **कास व्याधींमध्ये,पारावत इवाकूजन ।(च. चि.१८/२३)**असा शब्द ऐकू येतो.

**<u>स्पर्श</u>** : व्रणशोथ परीक्षण करताना व्रणस्पर्श तपासला जातो. व्रणाच्या विविध अवस्थांमध्ये सुद्धा विविध स्पर्शांची अनुभूती येते. जसे की, आमावस्था - शीतशोफता, मन्दोष्मता;पच्यमान अवस्था - अध्मातबस्तिरिव आततश्र्चशोफो भवति ।पक्व - बस्तौ इव उदक संचरणं पूयस्य । (सु. सू. १७/५)

**<u>दृक</u>** : नेत्राच्या परीक्षणावरून विविध शारीरिक, स्थानिक व्याधींचे ज्ञान होते. जसे की, अर्जुन हा व्याधी.

**एको य: शशरुधिरोपमस्तु बिन्दु: शुक्लस्थोभवति तमर्जुनम् वदन्ति ।(सु. उ.४/७)**

**<u>आकृती</u>** : रुग्णांची आकृती म्हणजे एकूणच त्याच्या शरीराची ठेवण होय. बऱ्याचदा आकृती वरूनच रोगनिदान होते. उदाहरणार्थ, फक्क या व्याधीमध्ये -

**क्षीणमांस बलद्युति संशुष्कस्फिच बाहुरूर्महोदरशिरोमुख: । (का. सं. चि. फक्क /१२-१७)**

**<u>दशविध परीक्षा</u>** : चरक विमान स्थान ८/२४ या ठिकाणी दशविध परीक्षा सांगण्यात आल्या आहेत. रोगी परीक्षा ही किती व्यापक व सखोल पणे केली आहे, याचा अंदाज यावरून येईल.

**<u>प्रकृती</u>** : बऱ्याचदा असे होते की रुग्णांस औषधे, पथ्य देऊनही म्हणावा असा उपशय नसतो. याबद्दल आपले निदान चुकले की काय, असा संभ्रम निर्माण होऊ शकतो. परंतु यामध्ये प्रकृतीची जी शारीर, मानस लक्षणे वर्णन केली आहेत, त्यावरून पथ्यापथ्य पालन करण्याबाबत व्यक्तिपरत्वे भिन्न दिसून येते. जसे की, पित्त प्रकृती रूग्ण पथ्यपालन काटेकोरपणे करते. परंतु वातप्रकृती रुग्ण यामध्ये खूप वैषम्य करतो. तसेच फॉलो अप ला वातप्रकृती रुग्ण कधीच वेळेवर येत नाही. त्या मानाने पित्त प्रकृती रुग्ण वेळेवर फॉलो अप ला येतात.

**<u>विकृती</u>** :हेतू, दोष, दूष्य, प्रकृती, देश, काल इ.च्या सहाय्याने विकृती परीक्षा करून व्याधी बल ठरवले जाते व त्यानुसार चिकित्सा ठरवता येते. रुग्ण विचारतात, साधारणपणे मला किती दिवस चिकित्सा घ्यावी लागेल? तेव्हा विकृती परीक्षेवरून चिकित्सा कालाचा साधारण अंदाज लावता येतो. तसेच औषधाची मात्रा व वीर्य ठरवता येते.

**<u>सारता</u> :शरीरमात्रदर्शनादेव भिषङ्मुह्येत् ।(च. वि.८/११५)**

**साराण्यष्टौ पुरुषाणां बलप्रमाणविशेषज्ञानार्थमुपदिष्टानि भवन्ति ।(च. वि. ८/११४)**

ANANT AYURVED PRATISHTHAN

फक्त शरीर बघून व्याधी निदान चुकू शकते. हेतुसेवनाने कमी झालेली सारता योग्य उपायांनी पुन्हा प्राप्त करता येते. आजकाल कुमारवयीन मुलांत अग्राह्य विषय सेवन झाले असता शुक्र, ओज यांचा क्षय होतो. त्यामुळे भीती वाटणे, आत्मविश्वास कमी होणे यांसारखी लक्षणे दिसून येतात. यांमध्ये शुक्रसारता वाढवावी लागते.

**<u>संहनन</u>** : संहनन म्हणजे रुग्ण शरीराचा सुघटितपणा बघणे. संहननाच्या उत्तम, मध्यम, अवरतेवरून आघातज व्याधी जसे की, व्रण, अस्थिभंग आदि बाधाकर ठरणे किंवा अबाधाकर ठरणे, हे अवलंबून असते. तसेच उत्तम संहनन असेल तर अवर संहनन असलेल्या व्यक्तीच्या तुलनेत भग्नसंधान लवकर होते. तसेच हल्ली केली जाणारी जिम, प्रोटीन पावडर यांचे सेवन यामुळे संहनन परीक्षा करताना आपली दिशाभूल होऊ शकते. कदाचित हाच त्यांच्या व्याधीचा हेतू देखील असू शकतो. आयुर्वेदामध्ये समसंहनन पुरुषाचे वर्णन आले आहे.

**सममांसप्रमाणस्तु समसंहननो नर: ।(च. सू. २१/१८)** अशा व्यक्तीचे व्याधिसहत्व उत्तम असते.

**<u>प्रमाण</u>** : प्रमाणयुक्त शरीराचे महत्त्व फक्त आयुर्वेदशास्त्रात वर्णिले आहे.

**तत्रायुर्बलमोज: सुखमैश्वर्यं वित्तमिष्टाश्चापरे भावाभवन्त्यायत्ता: प्रमाणवति शरीरे । च. वि. ८/११७**

अष्टौनिंदीतांपैकी अतिस्थूल, अतिकृश, अतिदीर्घ, अतिह्रस्व यांची प्रमाणत: विकृतीच असते. उदाहरणार्थ, अर्वाचीन शास्त्रांमध्ये असलेले Acromegaly, Gigantism.

**<u>सात्म्य</u>** : सात्म्य परीभाषेनुसार एखाद्या गोष्टीची आपल्या शरीरास सवय लागते. आयुर्वेदानुसार हितकर गोष्टींची शरीराला सवय लागणे हे योग्य फलदायक ठरते. परंतु अहितकर गोष्टींची सवय मात्र शरीरास अनारोग्यदाई ठरते. आजकाल आहारातील अतिप्रमाणातील कटू रस, अम्ल, लवण रस सेवन हे शरीर व्याधींबरोबर मानसिक विकार जसे की, क्रोध, चिडचिड, त्रागा आदि पित्तज उन्मादासारख्या विकृती घडवून आणते. कारण आपण घेतलेल्या आहाराने शरीर व मनाचे जसे पोषण होते तशीच चुकीच्या आहारसेवनाने विकृती ही होऊ शकते. जनसमुदायामध्ये असलेली व्यसनाधीनता जसे, अति मद्यपान, मशेरी, तंबाखू सेवन, ड्रग्स आदि अहितकर गोष्टीचे सात्म्याचे निदर्शक आहेत. वैद्याने निदान करताना रुग्णाच्या सात्म्य- असात्म्य गोष्टींची शहानिशा करावी. याचे कारण असे की, असात्म्य गोष्टी व्याधी हेतू ठरत असतील तर त्याचे परिवर्जन करावे लागते. यासाठीच वाग्भटांनी पादांशिक क्रम सांगितला आहे.

**पादांशेन त्यजेत्सात्म्यमहिते हितमाचरेत । एकान्तरं ततश्चोर्ध्वं द्वन्तरं त्र्यन्तरं तथा ॥ अ. सं. सू. ९**

**<u>सत्व</u>** : सत्व म्हणजेच मनाची परीक्षा व्याधी निदानात सांगितली आहे. कधीकधी भ्रम निर्माण होतो, कारण एखादी व्यक्ती गंभीर रोगाने पीडित असूनही आपल्या शरीर व मनोबलाने आणि शरीर सुसंहत असल्याने लहानशा

ANANT AYURVED PRATISHTHAN

वरवरच्या रोगाने पीडित असल्याप्रमाणे वाटते. याउलट दुसरी व्यक्ती छोट्याशा वरवरच्या रोगाने पीडित असूनही आपल्या मनोबल आणि शरीरबल अल्पतेने गंभीर व मोठ्या आजाराने ग्रस्त असल्याप्रमाणे वाटतो.

**तयो: अकुशला: केवल चक्षुषैव रुपं दृष्ट्वाऽध्यवस्यन्तो व्याधीगुरुलाघवे विप्रतिपद्यन्ते । (च.वि.७/३)**

**<u>वय</u> :** काही व्याधी त्या त्या वयातच होतात म्हणून वय विचार निदानासमयी करणे आवश्यक ठरते. बाल्यावस्थेत कफबहुल व्याधी, तरुणावस्थेत पित्तबहुल व्याधी, वार्धक्यावस्थेत वातबहुल व्याधी होतात. जसे की, लहान मुलांमध्ये कृमीनिदान हे बऱ्याचदा असते. वार्धक्यावस्थेत  वातव्याधी होतात. तसेच वयावरून व्याधीची साध्यासाध्यताही ठरवता येते.

**<u>आहारशक्ती :</u>** भूक  वेळेवर लागते का? खाल्लेला आहार पचतो का? हा आहारविचार आयुर्वेद शास्त्रांमध्ये खूप महत्त्वाचा आहे. कारण त्यावरून अग्नीचे अनुमान काढता येते. **रोगा: सर्वेऽपि मंदेग्नौ ।(अ. हृ. नि. १२/१)**

उदाहरणार्थ : एखाद्याला भूक असह्य असते. आहार अति प्रमाणात असतो. परंतु त्यामानाने शरीरसौष्ठव नसेल, तर असा व्यक्ती शोष, भस्मक आदींनी ग्रस्त असू शकतो. अशी शक्यता वर्तवतता येते.

**<u>व्यायामशक्ती :</u>** शरीरबल हे व्यायाम शक्तीवर अवलंबून असते. उत्तम व्यायाम शक्ती म्हणजेच उत्तम शरीरबल म्हणजेच  व्याधीसहत्व उत्तम. चिकित्सा त्यानुसार ठरवता येते.

अशाप्रकारे आयुर्वेदिक रोगनिदान संबंधीचा हा प्रपंच व माहिती मी इथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आयुर्वेद शास्त्र हे एक एक परिपूर्ण शास्त्र आहे. त्यातील सर्वच गोष्टी निःसंशयपणे आपल्याला यशप्राप्ती करून देतात. कोणत्याच गोष्टीचे ज्ञान अंशतः ज्ञानाने होत नाही. त्याचा परितः अभ्यास करून मगच निर्णयाप्रत पोहोचावे, असे आयुर्वेद रोगनिदानाचे ब्रीद आहे.

**न हि ज्ञानावयवेन  कृत्स्ने ज्ञेये विज्ञानमय उत्पद्यते ।(च. वि. ७/४)**

तसेच ,ज्या चिकित्सकाला शरीराचे संपूर्ण ज्ञान असते तो शारीरिक रोगांची चिकित्सा करण्यामध्ये कधीच असफल होत नाही!

**सर्वथा सर्वमालोच्य यथासंभवमर्थवित्। अथाध्यवस्येत्तत्वे च कार्ये च तदनन्तरम्। (च.वि-४/१०)**

सर्व विषयांचा सर्व बाजूंनी विचार करून चिकीत्सकाला रोग निश्चय केला पाहिजे. चिकित्सा तत्व विशेषतेने जाणणारा वैद्य चिकित्सा करताना मोहीत होत नाही.

AJANT AYURVED PRATISHTHAN